
मी, गॅलिलिओ



बोनी क्रिस्टेंसेन

मी, गॅलिलिओ आता म्हातारा झालो आहे आणि आता मी बघू शकत नाही,पण एक काळ होता जेव्हा मी सगळे तारे बघत होतो-चंद्र, ग्रह, सूर्य. या आकाशातील ग्रहांच्या गतीने मला एक असे सत्य दाखवले ,ज्यामुळे पूर्ण ब्रम्हांडाच्या बाबत आपली दृष्टी बदलून टाकली.या सत्याला खूप विरोध झाला आणि त्यामुळे मी संकटाच्या जगात गेलो.

गॅलिलिओचे संशोधन आणि अंतदृष्टी एवढे महान होते की आइंनस्टाईनने त्यांना "आधुनिक विज्ञानचा पितामह" म्हटले.पण त्यांच्या काळात, गॅलिलिओचे सूर्य-केंद्रित सौर मंडलाचे विचार, कट्टरपंथीयांनी इतकं भयंकर मानले की त्यांनी गॅलिलिओला निधर्मी म्हटले,त्यांना घरात कैद केले,आणि त्यांना विज्ञानावर चर्चा करायला प्रतिबंध केला. या प्रेरणादायी कहाणीमध्ये, बोनी क्रिस्टेंसन यांनी गॅलिलियोला स्वतःला त्यांची कहाणी ऐकवली.




मी, गॅलिलिओ



बोनी क्रिस्टेंसेन

मराठी: अश्विनी बर्वे




प्रस्तावना

अशा जगाची कल्पना करा ज्यात घड्याळ, थर्मामीटर किंवा दुर्बिण नाही. एक असे जग जिथे कोणीही असे मानत नव्हते की पृथ्वी स्थिर आहे कारण विशाल सूर्य, दिवसा एकदा तिच्या भोवती चारी बाजूला फिरतो.

गॅलिलिओचा जन्म वर्ष १५६४ मध्ये, जग जवळजवळ तसेच होते. हे ते जग होते ज्यात गॅलिलिओने काळ आणि अंतर मोजण्यासाठी नवनवीन प्रकार वापरून पाहिले आणि वैज्ञानिक प्रयोग केले.

खरंतर गॅलिलिओ असे मानत असे की त्यांचे सगळ्यात महत्वपूर्ण काम ग्रहांच्या गती बाबत आहे पण त्यांना खरी प्रसिद्धि आकाश निरीक्षणा मुळे मिळाली. गॅलिलिओ द्वारा दुर्बिण विकसित करण्याआधी कोणीही चंद्राच्या कला,शुक्राच्या कडा, सूर्यावरचे डाग किंवा बुधाचे चंद्र बघितले नव्हते.


अवलोकन, प्रयोग, गणित, आणि खूप चातुर्याने गॅलिलिओने असाधारण वैज्ञानिक शोध लावले. प्रश्न एवढाच होता की बाकी जग त्याचे म्हणणे ऐकायला तयार होते का?



मी, गॅलिलिओ गॅलीली, म्हातारा झालो आहे, आणि आता मी बघू शकत नाही,पण एक काळ होता जेव्हा मी सगळे तारे बघत असे – चंद्र, ग्रह, सूर्य यांनी मला त्यांच्या गतीचे सत्य दाखवले. एक सत्य एवढे गहन होते की त्यामुळे ब्रम्हांडाकडे बघण्याची आपली नजर बदलून गेली. एका सत्याची एवढी नाचक्की झाली की त्यामुळे मला मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागले.

आता मी एक कैदी आहे. मी माझ्या शेवटच्या दिवसापर्यंत या भिंतींच्या आत कैदी म्हणून राहण्यास मजबूर आहे. मी लूट नावाचे एक वाद्ययंत्र वाजवतो आणि जेव्हा मी नाइटिंगेलचे गाणं ऐकतो तेव्हा मला कळते की रात्र होईल. खरंतर अंधारात मी हळूहळू मरत आहे, मला माझ्या सुरुवातीची वर्षे, सूर्याचा प्रकाशाने भरलेल्या दिवसांची आठवण येते.





मी माझ्या आईवडिलांचा पहिला मुलगा होतो आणि त्यांच्या डोळ्यातला तारा होतो. त्यांचे जीवन माझ्या अवतीभवती असे. वडिलांच्या विद्यार्थीद्वारे वाजवलेल्या लुटच्या धून आमचे घर भरवून टाकत आणि मग धून कमी होत जात. जसजसा काळ गेला, आमचे कुटुंब वाढत गेले. मग पिसाचे आमचे घर संगीताने गुंजत असे.



प्रत्येक मोसमात, मी सेंट एंड्र्यूज चर्चची सावली पडलेली आणि रेंगाळलेली पाहिली आहे. मग मी विचार करे- रोज सावलीचा आकार थोडा-थोडा का बदलतो.

वडिलांनी मला संगीत आणि गणित शिकवले आणि मला त्या दोघांच्या मधला मेळ म्हणजे संगीत सिद्धांत समजावले. त्यांच्या क्रांतिकारी विचारांनी संगीत परंपरेला आव्हान दिले आणि त्याच बरोबर अधिकारी व्यक्तींना नाराज केले.

“प्रत्येक व्यक्तीला प्रश्न विचारण्याची परवानगी पाहिजे,” त्यांनी जोर देऊन विचारले, “आणि प्रत्येकाला सत्याचा शोध घेण्याचा मोकळीक पाहिजे.”



अकरा वर्षाचा असतांना, मला औपचारिक शिक्षणासाठी वलोम्ब्रोसाच्या मठात पाठवले. तिथले पवित्र, विद्वतापूर्ण जीवन मला आवडले, आणि म्हणून मी एक भिक्षुक होण्याचे ठरवले.

पण वडिलांनी लवकरच त्या विचाराचा शेवट केला. त्यांनी मला पिसाला परत बोलावले. त्यांनी मला विश्वविद्यालयात चिकित्सेचे शिक्षण घेण्यासाठी आणि एक डॉक्टर होण्याचा निर्णय घेतला. पण गणितात मला खूप मजा येत असे आणि डॉक्टरीचा अभ्यासाने मला कंटाळा येत असे. काही वर्षे आणि काही मतभेदां नंतर मी कोणत्याही पदवीशिवाय पदवीचे विश्वविद्यालय सोडून दिले.

पण एका चतुर मांजरीसारखा मी माझ्या पायावर उभा राहिलो. फ्लोरेंसच्या घरात मी वडिलांना संगीताच्या प्रयोगात मदत केली. मी गणित शिकवले आणि सार्वजनिक व्याख्यान दिले. ते इतके लोकप्रिय झाले की शेवटी मला पिसा विश्वविद्यालयात शिकवण्याचे आमंत्रण आले. हो! हे तेच विश्वविद्यालय होते जे मी कोणतीही पदवी न घेता सोडून दिले होते.



गॅलिलिओ आणि त्याच्या वडिलांनी परीक्षण केले की एखाद्या तारेची लांबी, ताण आणि जाडी एखाद्या सुरावर कसा प्रभाव करते, जेव्हा तारेला झटका बसतो.

खरंतर, मी पिसामध्ये लोकप्रिय नव्हतो. मी पंचवीस वर्षाच्या वयात परंपरेचा तिरस्कार केला. सगळ्यात आधी एक प्रोफेसरचा बोझिल कपडे घालायला नकार देऊन, मग ॲरिस्टॉटलच्या भौतिकच्या पवित्र नियमांवर एक वाद उभा केला.

प्रसिद्ध प्राचीन यूनानी दार्शनिक ॲरिस्टॉटलने दावा केला होता की कोणतीही जड कोणत्याही हलक्या वस्तूच्या तुलनेत वेगाने खाली पडते. मला ती गोष्ट अमान्य होती. माझे म्हणणे सिद्ध करण्यासाठी मी पिसाचा झुकलेल्या मिनारवरून वेगवेगळ्या वजनाच्या दोन तोफ्याचे गोळे टाकले. आणि जशी मी भविष्यवाणी केली होती. ते ठीक त्याच गतीने पडले. पण वैज्ञानिक सिद्धांत मांडूनही जनतेने सत्य मानले नाही. त्यानंतर मला पिसा विश्वविद्यालयात अध्यापनासाठी बोलावले नाही.







१५९२च्या हिवाळ्यात, पडुआ विश्वविद्यालयाने मला शिकवण्यासाठी बोलावले. तिथे वेतन चांगले होते आणि मला माझ्या प्रयोगासाठी अधिक वेळ मिळाला असता. मी पिसा मध्ये चर्च मध्ये एक लटकणारे झुंबर पाहिले ते मागेपुढे हलत होते पॅन्डुलमसारखे त्याचे दोलन, वेळेला चिन्हित करत असे. त्याच्या आठवणीमुळे मला ग्रहांची गतीचा मोठा अभ्यास करण्यासाठी प्रेरित केले. ज्यात पॅन्डुलम आणि वेळ मोजण्याच्या शक्यता होत्या.

पडुआ आणि जवळच्या व्हेनिसमध्ये,माझा तारा तेजाने चमकला. विनीशियन नौसेना आपल्या जहाजावर वल्हे कुठे ठेवायचे? त्याबाबत त्यांनी माझा सल्ला मागितला. मी एका सरळ कंपास तयार केला, जो जटिल गणित करण्यासाठी सक्षम उपकरण होते जे सेनेसाठी खूप उपयोगी होते.

हो, माझे कंपास ही एक असाधारण सफलता होती पण जे काही पुढे होणार होते त्याच्यापुढे ते तुच्छ होते.






व्हेनिसमध्ये एक नवीन डच गॅजेटच्या बाबत अफवा पसरत होत्या. ते उपकरण दूरच्या वस्तूंना मोठे दाखवण्यासाठी एक सक्षम स्पाईग्लास होता. मला तो विचार खूप आवडला आणि मी त्वरित तसे एक उपकरण तयार करायला सुरुवात केले. मी लेन्सचे डिझाईन केले आणि त्याला घासायला सुरु केले. काही आठवड्यातच, मी हातात, जगातली पहिली दुर्बिण घेतली होती.

व्हेनिसचे पाद्री आणि सिनेटर हे माझी दुर्बिण बघण्याची संधी मिळावी म्हणून अधीरतेने घंटी टॉवरच्या कड्यावर वाट बघत असत. दुर्बिणीच्या माध्यमातून त्यांनी क्षितिजावर छोटी जहाजे बघितली- असे जहाज काही तासानंतर फक्त डोळ्यांनी दिसत नाही. ते माझ्या नवीन रचनेने चकित झाले होते.

पण मी दुर्बिणीवर समाधानी नव्हतो. मला दुर्बिणीची शक्ती वाढवण्यासाठी पूर्ण उन्हाळ्यात काम केले.





३० नोव्हेंबर ते १९ डिसेंबर १६०९ला गॅलिलिओ
द्वारे तयार केलेले चंद्राच्या कलांचे चित्र




मग, एका पानगळीच्या रात्री मी आपली दुर्बिण आकाशाकडे उचलून चंद्र बघितला. आश्चर्यजनक! ॲरिस्टॉटलने बिलकुल एका गुळगुळीत चंद्राचे वर्णन केले होते,पण मला चंद्रावर डाग दिसत होते. आणि मग चंद्राच्या पलीकडे .... मी ताऱ्यांची अनंत दुनिया – आणि बुध बघितला. बुधाच्या चारी बाजूला चार छोटे खगोल चंद्र फिरत होते जो कधी आधी बघितले नव्हते.

आठ आठवडे मी थंडीत आपली रात्री घालवल्या,ब्रह्मांडाचा शोध घेतला, आणि चमकदार, अपूर्ण चंद्राचे विस्तृत रेखाचित्र काढले.

त्या हिवाळ्याच्या शेवटी, १६१० मध्ये,मी आपले निष्कर्ष "द स्टाररी मेसेंजर" नावाच्या पुस्तकात प्रकाशित केले. पुस्तक त्वरित विकले गेले. सर्व युरोप चंद्र,बृहस्पती आणि माझ्याबद्दल बोलू लागले. अचानक लोक माझी तुलना क्रिस्टोफर कोलंबस बरोबर करू लागले.

माझी प्रसिद्धी एवढी दूरपर्यंत पसरली की टस्कनीचे ग्रैंड ड्यूक, कोसिमो ॥ डे 'मेडिसीने मला फ्लोरेंस मध्ये आपल्या दरबारात येण्याचे आमंत्रण दिले. आता मी सर्व वेळ, आकाश अध्ययन करू शकत होतो. आता मी सूर्यावर काळे डाग आणि शुक्र ग्रहाच्या बदलणाऱ्या कलांचा अभ्यास करू शकत होतो.




२३ जून,१६१३



२६ जून, १६१३

आपल्या कक्षेवर सूर्याबरोबर फिरत सूर्याच्या डागांवर गॅलिलिओच्या
निरीक्षणामुळे प्रश्न विचारले गेले: पृथ्वीपण आपल्या अक्ष्यावर फिरते का?






मी माझ्या दुर्बिणीने ग्रहांबरोबर सूर्य आणि चंद्र पण बघितले. मी एक सत्य बघितले. मी बघितले सूर्य ब्रह्मांडचा कैंद्र आहे आणि पृथ्वी आणि बाकी सगळे ग्रह त्याच्या चारीबाजूला फिरत होते. माझ्या या सत्यामुळे या लोकप्रिय धारणेचे खंडन केले, कि सूर्य, चंद्र, ग्रह आणि सगळे बाकी तारे एका स्थिर पृथ्वीची परिक्रमा करतात. ॲरिस्टॉटलने हा सिद्धांत जवळजवळ दोन हजार वर्षे आधी सांगितला होता. टॉलेमीने काही काळानंतर तो परिष्कृत केले, आणि कॅथलिक चर्च ने तो कायम ठेवला.

जेव्हा गरीब कोपरनिकसने माझ्या जन्माच्या शतकापूर्वी, सूर्य-कैंद्रित ब्रह्मांडाचा प्रस्ताव ठेवला, तेव्हा प्रत्येकजण त्यावर हसले. पण कोपरनिकस जवळ आपला सिद्धांत सिद्ध करण्यासाठी कोणतीच पद्धत नव्हती-त्याच्याजवळ कोणतीच दुर्बीण नव्हती.

दुर्बीणीने मी बघितलं की बृहस्पतिचे चार छोटे खगोलीय चंद्र, बृहस्पतिच्या चारीबाजुला फिरतात, ते पृथ्वीच्या चारी बाजूला फिरत नाहीत जे लोकांना वाटत होते.


नंतर मी शुक्रच्या कला पण रिकॉर्ड केल्या. त्यांच्या प्रदक्षिणेच्या संख्या, एका पप्रदक्षिणेचा काळ, आणि शुक्राच्या विशिष्ट चम्केने सिद्ध केले की तो पण सूर्याच्या चारी बाजूला फिरतो, पृथ्वीच्या चारी बाजूला नाही आणि जर शुक्र, सूर्याची परिक्रमा करत असेल तर इतर ग्रह पण तसेच करत असतील, जसे कोपरनिकसने विचार केला होता.




शुक्र, सूर्याची परिक्रमा करतो आणि सूर्याचा प्रकाशाला परावर्तित करतो.

मी कोपरनिकसचा सूर्य-कैंद्रित सिद्धांताच्या बाबत लिहले. मी त्यांच्यावर जिथं शक्य होईल तिथं व्याख्याने दिली. लोकांनी माझ्या म्हणण्यावर संशय आणि अविश्वास दाखवला. लोक रागरागाने म्हणाले की माझे सिद्धांत कॅथोलिक चर्चच्या विरुद्ध आहेत. त्यांच्या मते मी एक धर्म विरोधी आहे.

मग, १६१६ मध्ये, एका चर्चच्या एका कमेटीने निर्णय दिला की सूर्य-कैंद्रित ब्रह्मांडचा विचारच धर्म विरोधी आहे. मला रोमला जाण्याचा आदेश दिला गेला. तिथे पोपच्या प्रतिनिधींनी मला कोपरनिकसच्या सिद्धांताची वकिली बंद करण्यास सांगितले, किंवा त्याचे परिणाम भोगण्याची धमकी दिली. मला स्पष्ट रूपाने जिओर्डानो ब्रूनोच्या जीवनाचा परिणामाची आठवण आली. ब्रूनो हा कोपरनिकसचा शिष्य आहे. त्याला सात वर्ष कैदेत बंद होता आणि शेवटी त्याला जाळून मारून टाकले होते..





पिसू (फ़्ली)



कुटकी (नैट)



किड (मॉथ)

म्हणून सात वर्षापर्यंत मी एकदम गप्प राहिलो.मी लेन्स तयार करण्याचे कौशल्य सांभाळले, अध्ययन आणि लेखन केले,आणि दुर्बीणी शिवाय मायक्रोस्कोप तयार केला. माझ्या सूक्ष्मदर्शकाने मी छोट्या छोट्या किटकांचा मोठा आनंद घेतला.पिसू भयानक दिसत असे,पण कीटक आणि नेट खूप सुंदर दिसत असे. आणि विशेष रूपाने एक आश्चर्यकारक गोष्ट होती ज्यात माश्या एखाद्या आरश्यासमोर उभ्या राहून उलटे चालू शकते. त्यात आपले अशी किमया होती पण तुम्ही सूर्य, चंद्र आणि तारयांशी तुलना करू शकतो का?

शेवटी माझ्यासाठी एक दार उघडले. माझा जुना मित्र माफ़ियो बारबेरिनी पोप झाला. त्याने मला रोमला बोलावले आणि मला सूर्य-केंद्रित सिद्धांताच्या बाबतीत लिहण्याचे स्वातंत्र दिले, पण त्याने सांगितले की ते फक्त विचाराच्या रुपात लिही, एक सत्याच्या रुपात लिहू नको. यापेक्षा कोणतीच गोष्ट मला अधिक खुश करू शकली नसती. नवीन आशा आणि उत्साहाच्या बरोबर मी परत एकदा माझे लक्ष आकाशावर केंद्रित केले.



डॉक्टरचा मुखवटा आणि कपड़े त्याला प्लेग पासून वाचवत असत.

"डायलाग ऑन द टू चीफ वर्ल्ड सिस्टम्स" पुस्तकावर मी सहा वर्षापर्यंत काम केले. मी नेहमी आजारी राहत असे आणि आता मी तरूण नव्हतो. माझे पुस्तक लवकर लिहून व्हावे म्हणून मी व्याकूळ झालो होती,पुस्तक छापावे आणि लोकांनी ते वाचावे. मला वाटत होते की सूर्य विरुद्ध पृथ्वी केंद्रित ब्रम्हांडावर लोकानी आपले तर्क सांगावे,आणि त्या मुद्द्यावर चर्चा करावी.पण जसे पुस्तक छापण्यासाठी तयार झाले तसे, बुबोनिक प्लेगने, फ्लोरेंसला उद्ध्वस्त केले आणि मग पूर्ण शहर थांबून गेले.

शेवटी दोन वर्षानंतर माझे पुस्तक प्रकाशित झाले. ते फ्लोरेंसमध्ये त्वरित विकले गेले. ज्यावर लोकांनी आनंद आणि आश्चर्य जाहीर केले.

पण रोमला पाठवलेल्या प्रतींचे काय झालं? तिथून काही उत्तर आले नाही. मी वाट बघितली आणि मला त्याबद्दल काळजी वाटली. पोप प्रसन्न होते का? मग सहा महिने निघून गेले.

मग मला एक भयानक बातमी मिळाली. माझ्या शत्रूंच्या एका समुहाने पोपचे कान भरले की मी माझ्या पुस्तकात "डायलाग ऑन द टू चीफ वर्ल्ड सिस्टम्स" मध्ये पोपला एक मूर्ख दाखवले आहे.पण तसे करण्याचा माझा विचार नव्हता. तरीही पोप माझ्यावर नाराज होते. माझ्या पुस्तकाचे वितरण त्वरित थांबवले गेले.




आकाशात अंधार पसरला आणि माझ्या चारी बाजूचे दरवाजे बंद झाले.


एक महिन्यानंतर, मला चर्चच्या न्यायालयीन समिती पुढे दावा चालवण्यासाठी रोमला बोलावले गेले. माझा अपराध? महीने बाद, मुझे चर्च की न्यायिक जांच समिति के सामने मुकदमा चलाने के लिए रोम बुलाया गया. मेरा अपराध? धर्महीन आणि कोपरनिकसच्या सिद्धांताचा पुरावा केला.

माझी शिक्षा?

बाकी दिवसांसाठी मला घराच्या भिंतीत कैद केले. माझ्या सगळ्या लेखनावर बंदी घातली गेली. मला शेवटचा झटका तेव्हा बसला जेव्हा इंक्विज़िशनने माझ्या विरुद्ध कोर्टाने केलेल्या आदेशाच्या प्रती सर्व युरोप मधील शहरातल्या भिंतीवर लावल्या गेली.हा माझा मोठा अपमान होता.



आता आपण इथं आहोत, सत्य आणि एक अंध म्हाताऱ्यां माणसाला, अर्केट्रीच्या पहाडामध्ये कैद केले गेले. तुम्ही एखाद्या म्हाताऱ्याला कैद तर करू शकतात,पण सत्य? सत्याला वाचण्याचा त्याची एक पद्धत असते.




शेवटचे शब्द

खरंतर गॅलिलिओला त्यांच्या शेवटच्या दिवसात कैद केले गेले होते.पण त्यांच्या विचारांनी आपली मुळे रुजवली होती.

काळा बरोबर गॅलिलिओ कडून प्रेरणा घेत इतर वैज्ञानिकांनी सिद्ध केले की गॅलिलिओ, सौर मंडलाच्या बाबत खरे होते, चालणाऱ्या वस्तूवर त्यांनी गॅलिलिओच्या सिद्धांतांचा विस्तार केला, आणि त्यांच्या संशोधनात सुधारणा केली.

गॅलिलिओचे योगदान इतके व्यापक होते की अल्बर्ट आइंस्टीनणे त्यांना "आधुनिक विज्ञानाचे जनक“ म्हटले.

१९९२ मध्ये, गॅलिलिओच्या दाव्याच्या चार शतकानंतर, कॅथलिक चर्चने अधिकृतपणे स्वीकार केले की गॅलिलिओची निंदा करणे ही त्यांची चूक होती आणि सूर्याला आपल्या सौर मंडलाचा केंद्र घोषित करणे बरोबर होते.



फ्लॉरेंसमध्ये उफीजी गॅलरीमध्ये, गॅलिलिओची एक मूर्ती.

कालक्रम

१५०३ - लियोनार्दो दा विंचीने फ्लॉरेंस, इटलीमध्ये मोनालिसाचे चित्र काढले.

१५०८ - माइकल एंजेलोने व्हेटिकन सिटी मध्ये सिस्टिन चर्चची पेंटिंग सुरु केले..

१५१९ - फर्डिनेंड मॅगलन स्पेनमधून जगभरचा प्रवास करण्यासाठी रवाना झाले.

१५४३ - पोलिश खगोलशास्त्रज्ञ निकोलस कोपरनिकसने आपली सूर्य-केंद्रित सिद्धांत प्रकाशित केला आणि त्यानंतर लगेच त्यांचा मृत्यू झाला.

१५५२ – इंग्लंडमध्ये भूगोल आणि खगोल विज्ञानाची पुस्तके जाळली कारण लोकांना वाटले की त्यात जादू आहे.

१५६४ - गॅलिलिओ गॅलीलीचा जन्म १५ फेब्रुवारीत पिसा मध्ये झाला.

१५६४ – इंग्रजी कवी आणि नाटककार विलियम शेक्सपियरचा जन्म २६ एप्रिलला झाला.

१५७० - अब्राहम ऑर्टेलियसने पहिला विश्व अटलस प्रकाशित केले, ज्याला "थिएटर ऑफ द वर्ल्ड“ म्हटले जाते,त्यात सत्तर मानचित्र होते.

१५८० - सर फ्रांसिस ड्रेकने पृथ्वीची परिक्रमा पूर्ण केली.

१५८१ - गॅलिलिओने पीसा विश्वविद्यालयमध्ये प्रवेश घेतला, जिथे त्यांनी चिकित्सा आणि गणिताचे अध्ययन केले.

१५९७ - गॅलिलिओने मितीय आणि कंपासचे संशोधन केले.

१५९९ – लंडनमध्ये ग्लोब थिएटरची निर्मिती झाली.

१६०२ - गॅलिलिओने पेंडुलम आणि काळ मोजण्याचे प्रयोग केले.

१६०७ - जेम्सटाउन, व्हर्जिनिया, इंग्रजी वसाहती बसवल्या.

१६०९ - गॅलिलिओने आपली दुर्बीण तयार केली.

१६११ - "द किंग जेम्स" बायबल प्रकाशित झाले..

१६१६ - पोप पॉल पंचमने गॅलिलिओला कोपरनिकन सूर्य-केंद्रित-ब्रह्मांड सिद्धांताला पाठींबा न देण्याची धमकी दिली.

१६१८ - प्रोटेस्टंट आणि कॅथलिक समुदायामध्ये तीस वर्षा चे युद्ध सुरु झाले.

१६२६ – रोममध्ये सेंट पीटर्स बेसिलिकाचे निर्मिती पूर्ण झाली.

१६३२ - गॅलिलिओचे पुस्तक "डायलाग ऑन द टू चीफ वर्ल्ड सिस्टम्स" प्रकाशित झाले. पोप अर्बन VIII (माफियो बारबेरिनी) ने पुस्तकाचे वितरण बंद केले आणि मामला न्यायलयात पाठवला.

१६३३ - गॅलिलिओ रोममध्ये धर्माधिकारी समक्ष पेश झाले. त्यांच्यावर धर्महीनतेच आरोप लावला गेला आणि त्यांना घरात बंद करण्यात आले आणि जन्मठेपेची शिक्षा झाली.

१६४२ - गॅलिलिओचा मृत्यु ८ जानेवारीला अर्सेट्री मध्ये झाला.

१६४२ - आयजॅक न्यूटनचा जन्म १५ डिसेंबरला इंग्लडमध्ये झाला.

१९८९ - नासाने बृहस्पतिच्या चंद्रांचा शोध घेण्यासाठी के चंद्रमाओं "गॅलिलिओ" नावाचे एक अंतरिक्ष यान लॉन्च केले.

१९९५ - "गॅलिलिओ" जुपिटर (बृहस्पति) ग्रह वर पोहचले.